पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३१०३** **दि. २६/०९/२०१९**

## मार्केटयार्ड पोलीस स्टेशन, पुणे शहर
## शिक्षिका महिलेची हरविलेली महत्वाची बॅग पोलीसांनी केली परत

दि.२६/०९/२०१९ रोजी मार्केटयार्ड पोलीस स्टेशन येथे एज्युकेशन सोसायटी प्रायमरी मराठी स्कुल कॅम्प येथे शिक्षक असणा-या नामे गोदावरी बबन लोखंडे रा.भारती विहार कात्रज पुणे ह्या दुचाकी वरुन शाळेकडे जात असताना त्यांच्या गाडीला अडकवलेली बॅग मार्केटयार्ड चौकामध्ये रस्त्यावर पडली.ती बॅग वाहतुक शाखेचे कर्मचारी व पोलीस स्टेशनकडील गोपनीय विभागाचे कर्मचारी यांना सापडली.सदर बॅगमधील एका कार्डवरील फोन नंबर वरुन संपर्क साधला असता तो सदर व्यक्ती ही बबन लोखंडे बोलत आहे असे सांगितले.सदर बॅग बाबत त्यांना विचारणा केली असता ती माझ्या पत्नीची आहे त्यांनी असे सांगितले.त्यानंतर आम्ही सदर इसमान मार्केटयार्ड पोलीस स्टेशन याठिकाणी येणेबाबत कळविले.मार्केटयार्ड पोलीस स्टेशन येथे गोदावरी बबन लोखंडे ह्या आले असता त्यांना त्यांची बॅग त्यांच्याजवळ देवुन बॅगमधील वस्तु पाहण्यास सांगितले असता त्यांनी त्याबॅगमधुन एक मोबाईल,महत्वाची कागदपत्रे,बँकेचे चेकबुक,पाच हजार रुपये रोख असे त्यामध्ये आढळुन आले.बॅगमधील सर्व वस्तु मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले.सदर वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री निंबाळकर,पोलीस नाईक पडळकर,महिला पोलीस शिपाई चांदगुडे, यांच्या हस्ते सदर बॅग गोदावरी बबन लोखंडे(शिक्षिका) यांना परत केले असता त्यांनी पुणे पोलीसांचे आभार मानले.

